सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :- एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/ प.रा.-३/२१ दिनांक :- १० मार्च, २०२२

## -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय**:- दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (मुख्य) परीक्षा-२०२०
**संदर्भ**:- जाहिरात क्र.०६/२०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २५ सप्टेंबर, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर ) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (मुख्य) परीक्षा-२०२० चा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ११ फेब्रुवारी,२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १४ मार्च, २०२२ ते २४ मार्च, २०२२ या कालावधीत मुंबई येथे घेण्यात येणार आहेत. उमेदवारांच्या मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येत असून त्यामध्ये मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ नमूद करण्यात आले आहे.

**२.** उमेदवारांना मुलाखत पत्रे त्यांच्या प्रोफाइलमध्ये उपलब्ध करून देण्यात येतील. अत्यंत अपरिहार्य कारणाशिवाय मुलाखतीचा दिनांक बदलून देण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. उमेदवारांनी मुलाखतीस येताना मुलाखतपत्राची प्रत घेवून येणे व त्यातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. मुलाखतीच्या वेळेस अर्जात दावा केल्या पृष्ठ्यर्थ आवश्यक सर्व मूळ प्रमाणपत्रे /सर्व गुणपत्रके/ निगडीत असणारी विहित प्राधिकाऱ्यांनी दिलेला अनुभव प्रमाणपत्रे इ. सादर करणे अनिवार्य आहे. त्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही व अशा उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार नाही.

**३.** कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोगाकडून मुलाखतपत्रावर दिलेल्या सूचनांचे तसेच स्थानिक प्राधिकरणाकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांचे पालन करणे अनिवार्य राहील

उपसचिव,परीक्षा राजपत्रित
ठिकाण- मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग